# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०२/०८/2021

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ४८ ) :- प्रभाग क्र.12 मधील आरक्षण क्र.246 मध्ये सैनिक व जेष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केंद्र व MPSC / UDIC विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी इमारत तयार करणे व पायाभुत सुविधा पुरविणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर क्षेत्रात प्रभाग क्र.12 मधील आरक्षण क्र.246 मध्ये सैनिक व जेष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केंद्र व MPSC / UDIC विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी इमारत तयार करणे व पायाभुत सुविधा पुरविणेचे काम मा.श्री.हसमुख गहलोत, उप महापौर यांनी संदर्भिय पत्रान्वये त्याच्या उप महापौर निधीमधुन करण्यासाठी मागणी केलेली आहे.

आरक्षण क्र.246 मध्ये "खेळाचे मैदान" मंजुर विकास आराखड्यानुसार आहे. सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र 20,000 चौ.मी. इतके असुन महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 17893.98 चौ.मी. इतके आहे. सदर प्रस्तावित इमारतीमध्ये तळमजल्यावर माजी सैनिक व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व पहिल्या मजल्यावर MPSC / UPSC विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी पायाभुत सुविधा पुरविणेकरीता इमारत बांधणेसाठी जागा उपलब्ध आहे. तळमजल्यावर माजी सैनिक व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करणे कामी रु.5,26,17,101/- (भाग -1) व पहिल्यामजल्यावर MPSC / UDIC विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी इमारत तयार करणे कामी रु.2,37,66,813/- (भाग-2) असा एकुण रु.7,63,83,914/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

वरील कामासाठी उपमहापौर निधी 2.25 कोटी व्यतिरिक्त इतर खर्चासाठी पुढील वर्षात तरतुद करावी लागेल. सदर कामास दोन वर्ष कालावधी लागणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Pc-09/VP/2021-22/DK/MG-3